# आदर्श महाविद्यालय, उमरगा

नॅक मूल्यांकन – "बी" ग्रेड
**कला, वाणिज्य व विज्ञान**

डॉ. दिलीप गरुड
(एम.एससी., पीएच.डी.)
प्राचार्य

ता. उमरगा जि. उस्मानाबाद पिन : ४१३६०६ फोन : (कार्या.) ०२४७५, २५२४०१ (नि.) २५३४०५ ई-मेल : sspmo01@rediffmail.com

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती

### कार्यक्रमाचा अहवाल

आदर्श महाविद्यालयामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती दि. 14.04.2023 रोजी अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि सामाजिक आणि आधूनिक भारत घडविण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची समाजाला व विशेषत: शिक्षण क्षेत्रा ातील विद्यार्थी आणि शिक्षकांना प्रेरणा मिळावी म्हणून त्यांच्या जयंतीनिमित्त आमच्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आले होते. सदरील स्पर्धेसाठी 38 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला यामध्ये

**प्रथम क्रमांक** : **कु. निकिता प्रकाश डोणगावे** B.Sc. 2nd Year

**द्वितीय क्रमांक** : **कु. निशीगंधा राजाराम भोसले** M.Sc 1st Year

**तृतीय क्रमांक** : **कु. नौशीन महमदसाब सास्तूरे** M.Sc. 2nd Year

वरील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पुस्तके देऊन गौरविण्यात आले. सदरील निबंध स्पर्धेसाठी प्रा. लक्ष्मण बिराजदार यांनी काम केले.

दि. 14.04.2023 रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन व कार्ये** या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. प्रथमत: कार्यक्रमाची सुरूवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पुजनाने करण्यात आली. परिसंवादासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप गरूड उपस्थित होते. त्यांनी या प्रसंगी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक कार्याची माहिती सांगितली. तसेच या कार्यक्रमास प्रमुख वक्त्या म्हणून प्रा.डॉ. अनिता लोंढे-सरपे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीयांचे प्रेरणास्थान आहेत तसेच मानव ते महामानव पर्यंतचा जीवनप्रवास त्यांनी विशद करून मानवता धर्म विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. कुलकर्णी एस.जी यांनी केले तर सूत्र संचालन प्रा. लक्ष्मण बिराजदार यांनी केले, आभार प्रा. डॉ. पवार एफ.आर यांनी केले. या कार्यक्रमास सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

**सोबत** : 1) **फोटो**

2) **कार्यक्रमाची बातम्याची लिंक**








GPS Map Camera
Omerga, Maharashtra, India
Adarsh college Omerga, Maharashtra 413606, India
Lat 17.833625°
Long 76.639982°
14/04/23 08:47 AM GMT +05:30
SAI NAGAR
Google









1) उमरगा येथील आदर्श महाविद्यालयाच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली

धाराशिव घडामोडी न्यूज़
https://youtu.be/2MUBEm69csA

2) उमरगा येथील आदर्श महाविद्यालयात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

सत्ता news
https://youtube.com/watch?v=owo6Zf7rMZ4&feature=share